**नियोजन (रोहयो) विभागातील विविध कामकाजाचा आढावा घेऊन योजनेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अभ्यासगट समितीची स्थापना करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन (रोहयो) विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : मग्रारो-२०२०/प्र.क्र.३०/रोहयो-७**
नवीन प्रशासन भवन, १६ वा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक : ०५ ऑक्टोबर, २०२०

**संदर्भ** :- १) नियोजन (रोहयो) विभाग नस्ती क्रमांक मग्रारोहयो-२०२०/प्र.क्र.३०/रोहयो-७

**प्रस्तावना :-**

नियोजन (रोहयो) विभागात खालील नमूद केलेल्या कामकाजाकरिता अभ्यासगट समितीची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधान होती.

अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीकरिता नरेगा सॉफ्ट हया संगणकीय प्रणालीचा वापर करण्यात येत असल्यामुळे योजनेचा संपूर्ण अहवाल हा त्या प्रणालीमधून प्राप्त होतो. अशा परिस्थितीत नियोजन (रोहयो) विभागाकरिता मंजूर करण्यात आलेल्या आकृतीबंधातील अव्वल कारकून, लघुटंकलेखक या पदांची तसेच बाहयस्थ संस्थेमार्फत कंत्राटी पध्दतीने विवीध पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या मनुष्यबळाची विभागास आवश्यकता आहे का? याचा आढावा घेणे.

ब) रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामपंचायत आणि पंचायत समितीच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर वैयक्तीक आणि सार्वजनिक स्वरुपाची कामे मोठया प्रमाणावर हाती घेण्यात येत आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यात पंचायत समिती स्तरावर फक्त रोहयोच्या कामकाजाकरिता अतिरीक्त गट विकास अधिकारी हे पद निर्माण करणे.

क) नियोजन (रोहयो) विभागास मंजूर करण्यात आलेल्या आकृतीबंधात कोणताही बदल न करता (अनावश्यक असलेली जुनी पदे व्यपगत करुन तसेच आवश्यक असलेली नवीन पदे ही एकूण मंजूर पदांच्या मर्यादेत निर्माण करुन) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन विभागाचा सुधारीत आकृतीबंध तयार करणे.

ड) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करुन त्याची कामाची गुणवत्ता वाढण्यासाठी काय उपाययोजना कराव्या लागतील याबाबतचा अहवाल तयार करणे.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त नमूद केलेल्या कामकाजांचा अभ्यास करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यासाठी खालील नमूद केल्याप्रमाणे नियोजन (रोहयो) विभागात अभ्यासगट समिती स्थापन करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) श्री.व्ही.गिरीराज | - | प्रधान सचिव (सेवानिवृत्त) | - | अध्यक्ष |
| २) श्री.वि.पु.काळे | - | उपसचिव (सेवानिवृत्त) | - | सदस्य |
| ३) श्रीमती ल.ध.वरखाडे | - | उपसचिव (रोहयो) | - | सदस्य सचिव |
| ४) श्री.विजयकुमार कलवले | - | सहाय्यक संचालक (रोहयो) | - | सदस्य |

उपरोक्त अभ्यासगट समितीने आपला अहवाल दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२० पासून दोन महिन्याच्या कालावधीत शासनास सादर करावा.

अभ्यासगट समितीचे अध्यक्ष श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव (सेवानिवृत्त) व सदस्य श्री.वि.पु.काळे, उपसचिव (सेवानिवृत्त) यांना अनुक्रमे प्रतिमाह रु.८०,०००/- व रु.६०,०००/- इतके मानधन प्रदान करण्यात येईल.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या मान्यतेने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २०२/२०२०/व्यय-८, दिनांक २८.०९.२०२० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२०१००६१२४१५५३०१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

NAND KUMAR

Digitally signed by NAND KUMAR
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=c98b875883e76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff487862cc567ee39, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=dcd3577ebf0e05e2a8b57095c152dc6cfb37c2bb83da197788645dd8a362ebc5, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NAND KUMAR
Date: 2020.10.06 13:02:50 +05'30'

( नंदकुमार )
**प्रधान सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा.मंत्री (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
२. मा.राज्यमंत्री (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
३. मा.प्रधान सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
४. सहसचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई
५. उपसचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सहाय्यक संचालक (लेखा) , नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई
७. नियोजन (रोहयो) विभागातील सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी/संशोधन अधिकारी यांना सूचीत करण्यात येते की, त्यांनी सदर अभ्यासगट समितीस आवश्यक ते सहकार्य करावे
८. निवडनस्ती (रोहयो-७).